स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 20–02–2015** रोजी **दुपारी 04–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 5. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 6. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 7. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 8. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 9. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 10. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 11. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 12. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 13. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 2. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 3. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. श्रावण हर्डिकर, आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 619:— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाकरीता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याचे काम मे. आर. बी. केवलरमानी व मे. डी.सी. गुरूबक्षानी यांच्यात समप्रमाणात विभागुन त्यांची प्राकलनीय राशीपेक्षा 3 टक्के अधिक दराची ( Current CSR 2014-15 नुसार 1.5 टक्के कमी दराची ) रू. 12877420.00 (रू. 6438710 + रू. 6438710) राशीची निविदा स्वीकृत निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 620:— जागनाथ बुधवारी, भारतमाता चौक जवळ सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 23,77,919/–(तेवीस लक्ष, सत्त्यात्तर हजार, नवशे एकोनविस) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ. –1000/सं.क्र.–241/प्र.क्र. 13/पा.पु. –21, मंत्रालय, मुंबई 32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम मेहतर समाज मागावर्गीय सर्वांगीण विकास संस्थेकडुन शासन निर्णय क्र. गवसु/1088/सी.आर. 2018, भा.ग. –2/का–7, मंत्रालय, मुंबई–32, शुध्दीपत्रक दि. 05 नोव्हेंबर 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथील करून

प्राकलनिय दर अधिक 15 टक्के कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देवुन त्यांचे मार्फत ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधणे व 30 वर्षाकरिता संचालन करणे व देखभाल करणे इत्यादि कामे करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 621:— संविधान चौक जवळ सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 19,35,019/—(एकोनविस लक्ष, पस्तीस हजार, एकोनविस) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ.—1000/सं.क्र.—241/प्र.क्र. 13/पा.पु. —21, मंत्रालय, मुंबई 32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम आदर्श ग्राम विकास संस्थेकडुन शासन निर्णय क्र. गवसु/1088/सी.आर. 2018, भा.ग.—2/का—7, मंत्रालय, मुंबई—32, शुध्दीपत्रक दि. 05 नोव्हेंबर, 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथील करून प्राकलनिय दर अधिक 15 टक्के कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देवुन त्यांचे मार्फत ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधणे व 30 वर्षाकरिता संचालन करणे व देखभाल करणे इत्यादि कामे करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 622:— मौजा नरसाळा प्रभातनगर येथे पुलाचे (Box Cell Bridge) काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. प्रशांत जी घोरमारे यांची प्राकलनीय दरांपेक्षा 14. 89 प्रतिशत कमी दराची रु. 29,33,068/— (अक्षरी एकोणतीस लक्ष तेहत्तीस हजार अडसस्ठ फक्त) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. A42001374602 (629) अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 623:— प्रभाग क्र. 32 अ व ब येथे निलकंठ अपार्टमेंट ते श्री. धोसेवान यांचे घरापर्यंत सतनामी नगर येथे सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. एस. के. इंटरप्रायजेस यांची प्राकलनीय दरांपेक्षा 9.11 प्रतिशत कमी दराची रु. 27,26,516/— (अक्षरी सत्तावीस लक्ष सव्वीस हजार पाचशे सोळा फक्त) राशीची निम्तम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. A22001330803 (682) F.P. अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 624:— मौजा—नरसाळा वार्ड क्र. ४ भुसारी ॲटोमोबाईल्स सेंटर ते सिरभैय्या मधुकरराव मेंढे ते हनुमान मंदिर ते कृष्णा थोटे ते महालक्ष्मी अपार्टमेंन्ट पर्यंत रस्त्यावरील खड्डयांची दुरूस्ती व पुर्नडांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. डि.सी.गुरूबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा ४.६५ टक्के कमी दराची रू. ३८,१४,७२५/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

कार्यादेश राशी प्रशासकीय मान्यता राशीच्या मर्यादेत सीमीत ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक 625:— प्रभाग क्रं. ४५ ब अंतर्गत श्रीकृष्ण नगर व शेष नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के. नगरारे कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा ४.६५ टक्के कमी दराची रू. ५०,४२,१३७/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

कार्यादेश राशी प्रशासकीय मान्यता राशीच्या मर्यादेत सिमीत ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक 626:— मौजा नरसाळा इन्द्रनगर, ब्रम्हानगर येथे पुलाचे (Box Cell Bridge) काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. राजेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा १३.१३ प्रतिशत कमी दराची रू. २९,९३,७२१/— (अक्षरी एकोणतीस लक्ष त्र्यांनऊ हजार सातशे एकवीस फक्त) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. A42001374602 (629) अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 627:— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 चे कलम 95 अन्वये नागपूर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मा. आयुक्त द्वारा स्थायी समितीस मंजुरी करिता सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सन 2014—2015 चे सुधारित व 2015—2016 चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून स्थायी समितीच्या मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर महानगरपालिकेचे सन 2014—2015 चे सुधारीत व सन 2015—2016 चे प्रस्तावित अंदाज पत्रक निगम आयुक्त द्वारा स्थायी समितीस सादर केले. अंदाजपत्रकाचे आर्थिक परिस्थितीचे व भाषणाचे वाचन केले.

नागपूर महानगरपालिकेचे सन 2014—2015 आयुक्त यांचेद्वारे सादर केलेल्या सुधारीत व सन 2015—2016 चे प्रस्तावित अंदाज पत्रकात दुरुस्ती व फेरबदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच केलेल्या दुरुस्ती व फेरबदलास म.न.पा. महासभेसमोर मंजूरीसाठी शिफारस करण्यास्तव पाठविण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 628 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर